फोन : ०२०-२९५१६२६४

अॅग्रोमेटअॅडवायझरी बुलेटीन
ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
कृषि हवामानशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५

ई-मेल : amfupune@gmail.com

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०/११/२०२६

जिल्हा : सोलापूर

हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२०/११/२०२६ ते २४/११/२०२६)				
दिनांक	21	22	23	24	25
पाऊस (मिमी)	0.0	0.0	0.0	0.0	0.0
कमाल तापमान (अं.सें.)	32	33	34	34	35
किमान तापमान (अं.सें.)	13	15	17	18	17
ढग स्थिती (आकाश)	1	2	3	3	6
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	61	76	79	68	73
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	42	47	47	52	60
वाऱ्याचा वेग (किमी/तास)	11	9	8	12	12
वाऱ्याची दिशा (अंश)	27	78	360	99	111

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक / पीक अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश/ इशारा	भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २० ते २४ नोव्हेंबर, २०२६ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.
विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस)	विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २५ नोव्हेंबर, २०२६ ते ०१ डिसेंबर, २०२६ दरम्यान ➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. ➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. ➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.
सामान्य सल्ला	• काढणी केलेल्या धान्याची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी. • हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल अॅपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल अॅपचा वापर करावा. • कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या 'कृषिदर्शनी'चा आणि सद्यस्थितीचा विचार करता आपत्कालीन पीक नियोजन पुस्तिकेचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. • ओलाव्याचा तीव्र ताण असल्यास पिकांवर अनावश्यक फवारणी टाळावी. • पिकांची नियमित पाहणी करा : जमिनीतील ओलावा, पिकाची अवस्था व ताणाची लक्षणे वेळेवर ओळखा. • सेंद्रिय आच्छादन करा : पिकांचे अवशेष, कडबा, पेंढा किंवा वाळलेले गवत वापरून जमिनीतील ओलावा टिकवा. आच्छादनामुळे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते. • कीड व रोगांचे निरीक्षण करा : आर्थिक नुकसान पातळीच्या जवळपास प्रादुर्भाव आढळल्यास शिफारशीनुसार नियंत्रण उपाय करा. अनावश्यक कीटकनाशक/बुरशीनाशक फवारणी टाळा. • जिल्ह्यातील कोरडवाहू/बागायती क्षेत्रात पिकाच्या संवेदनशील वाढीच्या अवस्थेत संरक्षित पाण्याची उपलब्धता असल्यासच रब्बी पिके जसे हरभरा, गहू आणि रब्बी ज्वारी पिकांच्या पेरणीचे नियोजन करावे. • रब्बी हंगामात पेरणी करताना शक्यतो आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. उदा. ज्वारी + हरभरा (६:३), करडई + हरभरा (३:६). • संरक्षित सिंचनाचा अत्यंत काटकसरीने वापर करावा. जास्तीत जास्त पाणी बचती साठी तुषार अथवा ठिबक सिंचनाचा कटाक्षाने वापर करावा. • जल व मृद संधारणासाठी बी बी एफ यंत्राद्वारे पेरणी करावी. • पेरणीवेळीस फुले बायोमिक्सची बीजप्रक्रिया करावी तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास फुले ग्रेड II ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी. • रब्बी हंगामात पिकामध्ये तणनाशके यांचा वापर कमी करून वेळोवेळी कोळपणी आणि खुरपणी करून पिके तणविरहित ठेवावीत. • कोरडवाहू क्षेत्रात रब्बी हंगामा तील पिकात कोळपणी केल्यास जमिनीस पडणाऱ्या भेगा बुजवल्या जाऊन जमिनीतील बाष्पीभवन कमी होऊन ओलावा टिकविण्यास मदत होते. • रब्बी हंगामातील पिकात विरळणी करावी कारण रोपांची संख्या जास्त झाल्यास ओलाव्यासाठी स्पर्धा वाढते आणि पीक फुलोऱ्यात येण्याच्या वेळी ओलावा कमी पडून उत्पादनात घट येते. • ज्या ठिकाणी पिक पेरणी होऊन १० ते १२ दिवस झालेले आहेत तिथे गरजेनुसार पाणी देऊन नांग्या भराव्यात किंवा विरळणी करावी. • ढगाळ हवामान राहण्याची शक्यता असल्याने रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी

		करावी.
ऊस	पीक वाढीची अवस्था	खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. ऊस पिकावरील पायरीला किडीचे नियमित निरीक्षण करावे. सरासरी ३ ते ५ पिल्ले किंवा प्रौढ कीड प्रति पान अथवा एका पानावर एक अंडीपुंज आढळल्यास आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्याचे मानून त्वरित नियंत्रणाच्या उपाययोजना सुरू कराव्यात. आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतरच क्लोरपायरीफॉस २० टक्के ई.सी. ३० मि.ली. किंवा ॲसिफेट ५० टक्के + इमिडाक्लोप्रिड १.८० टक्के एस.पी. ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. फवारणीपूर्वी संबंधित कीटकनाशकाचे सध्याचे CIBRC लेबल-क्लेम, पीक व किडीसाठी मंजुरी तसेच लेबलवरील सूचना तपासूनच वापर करावा. उभ्या ऊस पिकातील खालची वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावी. पिकास पाण्याचा ताण पडत असल्यास दर तीन आठवड्यांनी २ % मुरेट ऑफ पोटॅश व २ % युरिया यांचे मिश्रण तयार करून पिकांवर फवारणी करावी.
करडई	पिक वाढीची अवस्था	संरक्षित पाण्याची उपलब्धता असल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे तसेच सद्यस्थितीत पिकाच्या वाढीच्या अवस्थेप्रमाणे पिकात कोळपणी आवश्यक आहे. सध्याच्या हवामानामुळे करडईवरील माव्याच्या नियंत्रणासाठी ॲसिफेट ७५ एस. पी. १६ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात पहिली फवारणी पेरणीनंतर ४० ते ४५ दिवसांनी आणि दुसरी फवारणी ५५ ते ६० दिवसांनी करावी.
रब्बी ज्वारी	पिक वाढीची अवस्था	ज्वारीची पेरणी लवकर झाली आहे तिथे खोड किडी च्या जैविक नियंत्र णासाठी ५ ते ६ ट्रायकोकार्ड आठवड्याच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. ज्यांच्याकडे पाण्याची उपलब्धता असेल त्यांनी पिकास संरक्षित पाणी द्यावे. गरजेनुसार १० ते १२ दिवसाच्या फरकाने निंदणी करावी. पिकाच्या वाढीच्या अवस्थेप्रमाणे पिकात कोळपणी करावी (पेरणीनंतर तीन, पाच आणि आठ आठवड्यानी). पिक ३० ते ४० दिवसापर्यंत तण मुक्त ठेवावे.
गहू	पेरणी अवस्था	वेळेवर बागायती पेरणी लवकरात लवकर पूर्ण करावी . साधारण १०० –१२५ किलो बीयाणे प्रती हेक्टर वापरा वे. लागवड २०–२२.५ सेंमी ओळीचे अंतर ठेवून पेरणी करावी. प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरम या बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करून नंतर थायोमेथोझोंम ७० डब्लू.पी. १७.५ मिली प्रती १० किलो बियाणे कीटकनाशकाची आणि त्यानंतर अझोटोबॅक्टर २५ ग्रॅम प्रती किलो बियाणे अशी बीजप्रक्रिया करावी किंवा फुले बायो मिक्स १० मिली प्रती किलो बियाणास वापरावे.
रब्बी मका	पेरणी ते रोप अवस्था	पिकामध्ये (पेरणी नंतर ३ आठवड्यांनी) कोळपणी आणि खुरपणी करून पिक तणविरहित ठेवावीत. पेरणी लवकरात लवकर पूर्ण करावी. पेरणीसाठी १५–२० किलो प्रती हेक्टर बियाणे वापरावे. लागवड अंतर मध्यम व उशिरा येणाऱ्या वाणांसाठी ७५ × २० सेंमी, तर लवकर येणाऱ्या वाणांसाठी ६० × २० सेंमी. ठेवावे. बिजप्रक्रीयेसाठी प्रति किलो बियाण्यास २ –२.५ ग्रॅम थायरम चा वापर करावा. त्यानंतर अझोटोबॅक्टर २५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास लावावे किंवा फुले बायो मिक्स १० मिली प्रती किलो बियाणास वापरावे.
तुर	शेंगा पोसण्याची अवस्था	सिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी तुरीची पेरणी केलेली असल्यास पेरलेल्या तुरीची शेंगा पोसण्याच्या अवस्थेत संरक्षित पाणी द्यावे . तुरीच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत शेंगा पोखरणाऱ्या किडींनी आर्थिक नुकसानकारक पातळी ओलांडली असेल तर इंडोक्झाकार्ब १४.५ टक्के एस.सी. प्रवाही ७ मि.ली. किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के एस.जी. ३ मि.ली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.
केळी	पीक वाढीची अवस्था	बागेत करपा रोगाच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी करपग्रस्त पाने कापून ते नष्ट करावे ,त्यानंतर मेटिरम + पायऱ्याक्लस्ट्रोबिन या संयुक्त बुरशीनाशकाची तीन ग्रॅम प्रति लिटर पाणी अधिक बॅनोले (मिनरल ऑइल) १० मिली प्रति लिटर किंवा Azoxystrobin + Difenconazole २ मिली प्रति लिटर पाणी किंवा टेबुकनाझोल + ट्रीफ्लॉपझीस्ट्रोबिन ०.५ मिली प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी किंवा Tilt (Propiconazole) ०.५ मिली प्रति लीटर + मिनरल ऑइल १० मिली प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. केळी लागावडीनंतर चौथ्या महिन्यात सुक्ष्म अन्नद्रव्ये इडिटीए-जस्त आणि इडिटीए-लोह यांची प्रत्येकी ५० ग्रॅम मात्रा १० लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी. बागेस उपलब्धतेनुसार व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. पाणी देण्यासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. मृद ओलावा संवेदक वापरून गरजेनुसार सिंचनाचे नियोजन करावे. बागेला पाणी देताना शक्यतो रात्री किंवा पहाटे पाणी द्यावे. अच्छादनाचा वापर ३० मायक्रोन जाळीचा चंदेरी रंगाचा पॉलिथिन केळीच्या दोन ओळीतील मोकळ्या जागेत टाकण्यात यावे. सेंद्रिय आच्छादनाचा वापर केळीच्या दोन ओळीत वाढलेले उसाचे पाचट , गव्हाचा भुसा, सोयाबीनचा भुसा याचा सेंद्रिय आच्छादन म्हणून वापर करावा. केळी पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार ठिबक सिंचनातून शिफारशीत खते द्यावेत. बाष्पीरोधकाचा वापर केओलीन बाष्परोधक पावडरची ८० ग्रॅम प्रति लिटर प्रमाणे पंधरा दिवसांच्या अंतराने किंवा ऍसिटिल स्यालीसिलिक आम्ल १८० मिलिग्रॅम (इथेनॉलमध्ये विरघळून) प्रती दहा लिटर पाण्यात घेऊन झाडावर फवारणी करावी. घड़ व्यवस्थापन घड पूर्ण निसल्यावर केळ फुल वेळीच कापावे , घडांवर आठ ते नऊ फण्या ठेवून बाकी खालच्या फण्या कापून टाकाव्यात केळीचा घड पूर्ण निसवल्यावर व तद नंतर पंधरा दिवसांनी दहा लिटर पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट अधिक १०० ग्राम युरिया मिसळून धडावर फवारणी करावी किंवा केळफुल कापल्यानंतर एकदा व त्यानंतर तीस दिवसांनी दुसऱ्यांदा दहा लिटर पाण्यात २०० ग्राम सल्फेट ऑफ पोटॅश मीसळून घडावर फवारणी करावी, घडावर ६% सच्छेद्रतेच्या पांढऱ्या पॉलिथिन पिशव्यांचे आवरण करावे , बागेभोवती कुंपण करावे. निंबोळी पेंड झाडाची अवस्था पाहून २५०-५०० ग्रॅम प्रति झाड द्यावे.

डाळींब	पीक वाढीची अवस्था	बऱ्याच ठिकाणी मृग बहाराची फळे काढणी झाली असून उर्वरित फळे काढून बाग स्वच्छ करावी. हस्त बहाराची फळे वाढीच्या अवस्थेत असून संरक्षित पाण्याचा काटकोरपणे वापर करावा तसेच झाडांवर फळांची संख्या मर्यादित ठेवून फळे तडकणार नाही याची काळजी घ्यावी . ज्या शेतकरी बांधवांकडे खात्रीशीर पाण्याचा साठा उपलब्ध असेल त्यांनी आंबे बहाराचे नियोजन करण्यास हरकत नाही. जमिनीच्या मगदूरानुसार बागा तानावर सोडून बागेची स्वच्छता राखावी तसेच रोगग्रस्त फांद्या काढून टाकाव्यात.
द्राक्ष	पीक वाढीची अवस्था	१. छाटणीनंतर लगेच वेलीच्या खोडांना आणि वलांड्यांना कॉपर ऑक्झीक्लोराईड ५०% डब्लू पी., ०.४ टक्के अधिक गेरू ३ किलो प्रति १० लिटर अथवा १० टक्के बोडों पेस्ट + १५ मि.ली. स्टिकर प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात पेस्टींग करावे. २. उडद्या भुंगेऱ्याच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८% एस. एल. ३ मि.ली. प्रती १० लि. पाणी या प्रमाणात फवारावे.
बोर	पीक वाढीची अवस्था	बोरीची फळे वाढीच्या अवस्थेत असून काही ठिकाणी बोरीचे फळे तयार होण्यास सुरुवात झाली आहे , पिकास पाण्याचा ताण बसल्यास पाने व फळे गळू शकतात त्यासाठी संरक्षित पाणी द्यावे . फळ माशीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी एकरी चार ते पाच संरक्षक सापळे लावावेत.
पेरू	पीक वाढीची अवस्था	अर्ध पक्व फळावर फळमाशीच्या नियंत्रणासाठी एकरी १० कामगंध (मिथिल युजिनाल) सापळे लावावेत. पेरू या पिकावर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ट्रायकोड र्मा प्लस या जैविक नियंत्रकाची १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात खोडाभोवती आळवणी करावी. पेरूमधील एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करताना त्यामध्ये ग्रेड II या सूक्ष्म अन्नद्रव्याचा समावेश प्रामुख्याने करावा आणि फुले सुपर बायोमिक्स या जैविक उत्पादनाचा वापर ४ लीटर प्रती एकर या प्रमाणात ठिबकद्वारे करावा यामुळे जमिनीतील हानिकारक बुरशींचा नाश करता येतो.
सिताफळ	पीक वाढीची अवस्था	हलक्या जमिनीत ५ ते ६ दिवसांनी , मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी आणि भारी जमिनीत १० ते १२ दिवसांनी पाणी द्यावे. बागेस ठिबक सिंचनाचा वापर करावा. सिताफळाची काढणी पक्वतेची लक्षणे दिसल्यास जसे फळांचा रंग फिकट हिरवा झाल्यावर , फळाचे डोळे उघडून दोन डोळयांमधील भाग पांढरट पिवळसर रंगाचा दिसू लागल्यावर फळांचे खवले उंच होतात, फळांची साल डोळयामधून फाटण्यास सुरुवात झालेवर काढावीत. फळे काढल्यानंतर प्रतवारी करुन क्रेटमध्ये अगर कोरुगेटेड फायबर बोर्ड बॉक्सेस मध्ये पॅकिंग करुन त्वरीत विक्रीसाठी पाठवावी . सिताफळ पिकातील फळमाशी व्यवस्थापनासाठी कामगंध सापळे प्रति एकरी ४ ते ५ या प्रमाणात वापरावेत. हे सिताफळ हंगाम संपेपर्यंत ठेवावे
फळबाग	नियोजन	सध्याच्या हवामानामुळे फळबागांमध्ये बाष्पीभवन कमी करण्यासाठी सेंद्रिय आच्छादनाचा वापर करावा तसेच बाष्परोधकाची (केओलीन ३%) फवारणी करावी. बागेस ठिबक सिंचनाचा सकाळ आणि संध्याकाळी वापर करावा. फळधारणा जास्त असल्यास विरळणी करावी. बागेत नत्र खताचा वापर कमी करावा. बाग नेहमी तणनियंत्रण करून स्वच्छ ठेवावी. बागेस सेंद्रिय खतांचा वापर करावा.
जनावरांचे व्यवस्थापन		**चारा व्यवस्थापन** १)पाण्याची उपलब्धता अत्यंत मर्यादित असल्यास मोठ्या क्षेत्रावर चारा पीक घेण्याऐवजी आवश्यक पशुधनासाठी मर्यादित क्षेत्रात संरक्षित सिंचनाखाली चारा उत्पादनाचे नियोजन करावे. २)उपलब्ध पाणी, पेरणीची वेळ, जमिनीतील ओलावा व स्थानिक हवामान लक्षात घेऊन ज्वारी , बाजरी, मका, बरसीम किंवा लुसर्न यांसारख्या चारा पिकांचा विचार करावा. ३)संभाव्य चाराटंचाई लक्षात घेऊन उपलब्ध हिरवा चारा , कडबा, पिकांचे अवशेष व वाळलेल्या चाऱ्याचे योग्य नियोजन करावे. ४)उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन , कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांची लागवड , मुरघास निर्मिती व चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्यावर भर द्यावा. ५)उपलब्ध हिरवा चारा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात जनावरांना देण्याऐवजी त्याचे नियोजनबद्ध वाटप करावे. ६)सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका व भुईमुग पिकांपासून उपलब्ध होणाऱ्या अवशेषांचा चारा म्हणून वापर करावा. ७)पीक अवशेषांचे योग्य प्रकारे कुट्टीकरण करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी , जेणेकरून भविष्यातील चाराटंचाईची तीव्रता कमी करता येईल. **ऊसाच्या वाड्याचा वापर:** उसाचे वाडे उपलब्ध असल्यास ते नियमित वापरता येईल , व जास्त प्रमाणात उपलब्ध असल्यास त्याचा मुरघास करता येईल, परंतु मुरघास करताना त्यामध्ये आर्द्रता ६५ टक्के असावी व त्याचे साधारणतः १-२ सेमी प्रमाणात चॅफिंग म्हणजे तुकडे करावे. १०० किलो वाड्यांसाठी १-२ किलो मळी काही प्रमाणात पाणी मिसळून शिंपडावी , कल्चर वापरून नंतर हा चारा घट्ट दाबून ३५-४० दिवस हवाबंद ठेवावा. त्यानंतर हळूहळू मुरघासाचा समावेश आहारात करावा. **सुक्या चर्या सोबत युरिया चा वापर:** १०० किलो गव्हाचे काड/ /चिपाड/ इत्यादीसाठी २ किलो युरिया २० लिटर पाण्यामध्ये विरघळून त्यामध्ये ५ किलो मळी, १ किलो खनिज मिश्रण व अर्धा किलो मीठ द्रावण करून चाऱ्यावर शिंपडावे मिसरुन घ्यावे व किमान तीन तास झाकून नंतर खायला द्यावे. यामुळे अमोनिएशन पूर्ण होत नसले तरी नत्राचा स्रोत , पर्यायाने काही अंशी

		सूक्ष्मजिवाणू प्रथिने , ऊर्जा, खनिजे व मिठाचा पुरवठा होऊन किमान निर्वाह करता येईल. सहा महिन्या खालील वासरांना हा चारा देऊ नये.

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : -
ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : २०.११.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा
प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे